ePaper
दसरा मेळावा शिवाजी पार्कवरच' ; परवानगी मिळण्याबाबत मुख्यमंत्र्यांना विश्वास



| वर्ष - 6 । अंक - 155 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- खडकवासला, पानशेत धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवणार
- देशमुखी खाक्या !
- पुण्याचा पाऊस आणि कमी पडलेली माध्यमे

www.mahaenews.com | । बुधवार । दिनांक 14 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### उद्योगप्रकल्प गुजरातला गेल्यामुळे आदित्य ठाकरे संतापले, 'खोके सरकार'वर गुंतवणूकदारांचा अविश्वास!

# स्वत:साठी खोके, महाराष्ट्रासाठी धोके!

## आदित्य ठाकरे यांची जहरी टीका : वेदांत-फॉक्सकॉन प्रकल्पावरुन नवा वाद



**'खोके सरकार' राजकारणात (VEDANTA PROJECT) व घराघरात फिरण्यात व्यस्त आहे. प्रशासनावर, कायदा सुव्यवस्थेवर कोणाचाच अंकुश नाही. खोके सरकारला माझी विनंती आहे, पिस्तुल काढणं, धक्काबुक्की करणं, गुंडगिरीची भाषा करणं सोडून द्या आणि अशा मोठ्या इंडस्ट्रीजना राज्यात आणावं जेणेकरून तरुण बेरोजगारांना रोजगार मिळेल.**
**- आदित्य ठाकरे, आमदार, शिवसेना.**



**फॉक्सकॉन- वेदांताचा सेमीकंडक्टर बनवण्याचा प्रकल्प महाराष्ट्रातून गुजरातला गेला. ह्या प्रकल्पाची एकूण गुंतवणूक १ लाख ५८ हजार कोटींची आहे. हा प्रकल्प पुण्याजवळ तळेगाव येथे होणार होता. प्रचंड रोजगारनिर्मितीची क्षमता असणारा प्रकल्प महाराष्ट्रातून निसटलाच कसा? हा प्रकार गंभीर आहे. म्हणूनच ह्या विषयाची सखोल चौकशी व्हायलाच हवी. महाराष्ट्र हे गुंतवणूकदारांच्या प्राधान्यक्रमाचं राज्य होतं. अशा राज्यातून गुंतवणुकीचा उलटा प्रवास सुरु होणं हे चांगलं लक्षण नाही. राजकारणाच्या पलीकडे जाऊन ह्या विषयाकडे बघायला हवं.**
**- राज ठाकरे, अध्यक्ष, मनसे.**

**। पुणे । महाईन्यूज ।**

तळेगाव दाभाडे येथील वेदांत-फॉक्सकॉन सेमीकंडक्टर हा प्रोजेक्ट गुजरातला वळवण्यात येणार आहे. तसे वेदांत रिसोर्सेस लिमिटेडचे चेअरमन अनिल अग्रवाल यांनी अधिकृतपणे जाहीर केले. त्यानंतर याला राजकीय किनार लाभली असून, राज्याचे माजी पर्यावरण मंत्री, आमदार आदित्य ठाकरे यांनी शिंदे सरकारवर जोरदार टीका केली आहे. राज्यात येऊ घातलेला वेदांता आणि फॉक्सकॉनचा उद्योग गुजरातला वळवण्यात आला आहे. यावरून माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे आणि माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी राज्य सरकारवर आसूड ओढले आहेत. हा प्रकल्प राज्यात येणार हे ९५ टक्के ठरलेले असताना महाराष्ट्राबाहेर का गेला याचं उत्तर सरकारने द्यावं असं आव्हान आदित्य ठाकरेंनी केलं आहे. तसंच, राज्यातील सरकार हे स्वतःसाठी खोके आणि महाराष्ट्रासाठी धोके असल्याचीही टीका आदित्य ठाकरेंनी केली. पत्रकार परिषद घेत आदित्य ठाकरेंनी सरकारला सवाल केले. यावेळी माजी मंत्री सुभाष देसाई, अनिल परब, विनायक राऊत उपस्थित होते. महाराष्ट्रातील हजारो लोकांना रोजगार मिळवून देणारा हा प्रकल्प गुजरातला हलविण्यात आला. यावर शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी दुःख व्यक्त करत शिंदेसरकारवर टीकास्त्र सोडले आहे. आदित्य ठाकरे यांनी ट्विट करत म्हंटले आहे की, "वेदांतचा प्रोजेक्ट गुजरातला गेल्याचे समजले. वेदांतला आणि गुजरातला माझ्या शुभेच्छा आहेत. आपल्या देशात एवढा मोठा प्रोजेक्ट येणे, हे चांगलेच आहे. या प्रोजेक्टसाठी आम्ही गेल्या वर्षभरात अनेक बैठका घेऊन, भेटीगाठी करून पुण्याजवळ हा प्रोजेक्ट येईल, या हेतूने काम करत होतो. पण हा प्रोजेक्ट इतर राज्यात गेला त्याचे दुःख नाही, पण आपल्या राज्यात का आला नाही? याचे आश्चर्य आहे. ज्या प्रोजेक्टवर एवढं काम करून मविआ सरकारने एवढं पाठबळ देऊनही हा प्रोजेक्ट तिथे जाणे, याचा अर्थ हाच आहे की नवीन गुंतवणुकदारांना या खोके सरकारवर विश्वास नाही."

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार : अनिल अग्रवाल

वेदांत रिसोर्सेस लिमिटेडचे चेअरमन अनिल अग्रवाल म्हणाले, की मला जाहीर करताना आनंद होत आहे, कि नवीन वेदांत-फॉक्सकॉन सेमीकंडक्टर प्लांट हा गुजरातमध्ये स्थापित केला जाईल. वेदांताची ₹1.54 लाख कोटींची महत्त्वपूर्ण गुंतवणूक भारताच्या आत्मनिर्भर सिलिकॉन व्हॅलीला प्रत्यक्षात आणण्यास मदत करेल. तसेच त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत म्हंटले आहे, कि भारतात सेमीकंडक्टर मॅन्युफॅक्चरिंग हब तयार करण्याची तुमची दृष्टी आणि दृढनिश्चयाबद्दल तसेच गुजरात सरकारच्या पूर्ण सहकार्याने आम्ही या प्रकल्पाची जलद अंमलबजावणी आणि इलेक्ट्रॉनिक्समध्ये भारत आत्मनिर्भर बनवण्यासाठी वचनबद्ध आहोत.

# पाणीपुरवठा, महापौर निधीसाठी सेना सरसावली !

## महिला आघाडीचे निवेदन : शहरात दररोज पाणीपुरवठा करण्याची मागणी

**पिंपरी ।।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवडकरांना दररोज पाणीपुरवठा करावा. तसेच थांबलेला महापौर निधी प्रशासक म्हणून पुन्हा चालू करावा, अशी मागणी शिवसेनेच्या महिला आघाडीच्या वतीने करण्यात आली. शिवसेना नेत्या सुलभा उबाळे आणि माजी नगरसेविका मीनल यादव यांच्या नेतृत्वात महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले.



**पिंपरी- चिंचवडकरांची तहान भागविणारे पवना धरण १०० टक्के भरले आहे. धरणातून पाण्याचा विसर्ग केला जात आहे. पण, नागरिकांना दररोज पाणी मिळत नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये मोठी नाराजी आहे. आता दसरा, दिवाळी जवळ आली आहे. सणासुदीच्या काळात नागरिकांना पुरेसे पाणी मिळाले पाहिजे. महापालिका प्रशासनाने तत्काळ दररोज पाणीपुरवठा सुरू करावा. यावेळी महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त शेखर सिंह यांचे शिवसेना महिला आघाडीच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.**

माजी नगरसेविका मीनल यादव म्हणाल्या की, शहरवासीयांना सध्या दिवसाआड पाणी पुरवठा केला जात आहे. तीन ते चार वर्षांपासून संपूर्ण शहराला दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. पिंपरी-चिंचवडकरांची तहान भागविणारे पवना धरण १०० टक्के भरले आहे. धरणातून पाण्याचा विसर्ग केला जात आहे. पण, नागरिकांना दररोज पाणी मिळत नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये मोठी नाराजी आहे. आता दसरा, दिवाळी जवळ आली आहे. सणासुदीच्या काळात नागरिकांना पुरेसे पाणी मिळाले पाहिजे. महापालिका प्रशासनाने तत्काळ दररोज पाणीपुरवठा सुरू करावा.

यावेळी महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त शेखर सिंह यांचे शिवसेना महिला आघाडीच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, माजी नगरसेविका मीनल यादव, उपजिल्हा संघटिका वैशाली मराठे, उपशहरसंघटिका वैशाली कुलथे, रजनी वाघ, विभागसंघटिका बेबी सय्यद, कोमल जाधव, शिल्पा अनपन, अश्विनी खंडेराव, प्रांजल पाडेकर, स्मिता पाटील, शोभा मोरे आदी उपस्थित होते.

# खडकवासला, पानशेत धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवणार!

## खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील चारही धरणांत संततधार

**। पुणे। महाईन्यूज ।**

खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील चारही धरणांत संततधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे खडकवासला, पानशेत धरणे पूर्ण क्षमतेने म्हणजे १००% भरलेली आहेत. धरण क्षेत्रामध्ये पडणाऱ्या पावसाच्या प्रमाणात आणि येणाऱ्या पाण्यात वाढ होत आहे. परिणामी तरी येत्या दोन तासांमध्ये नदीपात्रामध्ये विसर्ग वाढविण्यात येण्याची दाट शक्यता जलसंपदा विभागाने व्यक्त केली. सोमवारी रात्रीपासून मंगळवारी सकाळपर्यंत टेमघर धरणात ४० मिलिमीटर, वरसगाव धरणक्षेत्रात २० मि.मी., पानशेत धरण परिसरात १८ मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली. मंगळवारी सकाळपासून चारही धरणांच्या परिसरात जोरदार बरसत आहेत. त्यामुळे खडकवासला धरणातून मुठा नदीत १९२९ क्युसेकने पाणी सोडण्यात येत आहे. सकाळी ११ वाजल्यानंतर हा विसर्ग ३४२४ क्युसेकपर्यंत वाढविण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये, नदीपात्रात काही तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावीत. सखल भागातील संबंधीत नागरिकांना सूचना देण्यात याव्या आणि उचित कार्यवाही करण्यात यावी.सर्वांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घ्यावी, असे आवाहन खडकवासला, पानशेत व वरसगाव प्रकल्पाचे सहाय्यक अभियंता यो.स.भंडलकर यांनी सांगितले.



**धरण क्षेत्रामध्ये पडणाऱ्या पावसाच्या प्रमाणात आणि येणाऱ्या पाण्यात वाढ होत आहे. परिणामी तरी येत्या दोन तासांमध्ये नदीपात्रामध्ये विसर्ग वाढविण्यात येण्याची दाट शक्यता जलसंपदा विभागाने व्यक्त केली. सोमवारी रात्रीपासून मंगळवारी सकाळपर्यंत टेमघर धरणात ४० मिलिमीटर, वरसगाव धरणक्षेत्रात २० मि.मी., पानशेत धरण परिसरात १८ मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली. मंगळवारी सकाळपासून चारही धरणांच्या परिसरात जोरदार बरसत आहेत. त्यामुळे खडकवासला धरणातून मुठा नदीत १९२९ क्युसेकने पाणी सोडण्यात येत आहे. सकाळी ११ वाजल्यानंतर हा विसर्ग ३४२४ क्युसेकपर्यंत वाढविण्यात येणार आहे.**



# बोट दाखवेल तेथे बोटसेवा सुरू झालीच पाहीजे

## या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे आंदोलन

**। पुणे। महाईन्यूज ।**

पुणे शहरात जोरदार झालेल्या पावसामुळे अनेक रस्त्यावर आणि घरांमध्ये पाणी साचलेले पाहायला मिळाले. मुसळधार पावसामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल झाले. रस्त्यावर आणि सखल भागात पाणी साचल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला. या त्रासाला महापालिका प्रशासन आणि सत्ताधारी भाजप जवाबदार आहे . पालिकेत भाजपची सत्ता असताना कोणत्याही उपाययोजना केल्या नाहीत त्यामुळे पुणेकर नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागले आहे. त्या पार्श्वभूमीवर पुण्यात बोट दाखवेल तेथे बोटसेवा सुरू झालीच पाहीजे, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे महापालिकेबाहेर आंदोलन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते प्रदीप देशमुख म्हणाले की, पुणेकर नागरिकांनी भाजपाला एकहाती सत्ता दिली.

मात्र मागील पाच वर्षांच्या काळात त्यांना विकासकामे करण्यात अपयश आले आहे. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे शहरातील अनेक रस्त्यावर खड्डे आणि त्यात मागील तीन दिवस सुरू असलेला मुसळधार पाऊस, यामुळे नागरिकांनी प्रवास कसा करायचा असा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे बोट दाखवेल तेथे बोटसेवा सुरू झालीच पाहीजे अशी मागणी महापालिका प्रशासनाकडे करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

---

### चिंचवडमध्ये उद्योजकता विकास परीचय प्रशिक्षण कार्यक्रम

**पिंपरी :** आयडीअल इंटरनॅशनल इंस्टिटयूट ऑफ एज्युकेशन आणि महाराष्ट्र शासन किडा व युवक सेवा संचलनालय, पुणे हयांच्या संयुक्त विद्यमाने चिंतामणी रात्र प्रशाला, चिंचवड यांच्या वतीने स्वयंरोजगार व उद्योजकता विकास परिचय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

१५ व १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी 5 वाजता आयडीअल इंटरनॅशनल इंस्टिटयूट ऑफ एज्युकेशनच्या चिंचवड येथील कार्यालयात या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन अतिरीक्त आयुक्त उल्हास जगताप करणार आहेत. हा कार्यक्रम पुर्णतः निशुल्क असेल. कार्यक्रमात विविध विषयातील तज्ञ लाभार्थीना व्यवसाय व उद्योग उभारणीसाठी मार्गदर्शन करतील. असे आयोजकांनी सांगितले आहे. अधिक माहितीसाठी 9822285400 , 8308367589 या क्रमांकावर संपर्क साधावा.

# कृषी उपसंचालकांना मिळणार बढती

## 81 जणांकडून मागविला पसंतीचा विभाग

**। लोणावळा । महाईन्यूज ।**

**महाराष्ट्र कृषी सेवा गट 'अ' मधील कृषी उपसंचालकांच्या बढतीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यांना अधीक्षक कृषी अधिकारी पदावर बढती मिळणार आहे. राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने २०२१-२२ च्या निवड सूचीमधील पात्र अधिकाऱ्यांच्या यादीला मान्यता दिली असून, त्यात ८१ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या बढतीमुळे कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) आणि मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाला (स्मार्ट) सर्वाधिक मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. आयुक्तांनी काढलेल्या परिपत्रकांनुसार यादीत समावेश असलेल्या कृषी उपसंचालकांनी आपल्या पसंतीचा एक महसूल विभाग नमूद करून अन्य पूरक कागदपत्रांसह आपला अर्ज १४ सप्टेंबरअखेर दिलेल्या मेल आयडीवर पाठवायचा आहे. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. या सर्व प्रक्रियेवर कृषी सहसंचालकांनी लक्ष ठेवायचे आहे. हा आदेश कृषी आयुक्तांनी नागपूर, अमरावती, औरंगाबाद, लातूर, नाशिक, ठाणे, कोल्हापूर आणि पुणे विभागाच्या कृषी सहसंचालकांना काढला आहे. गील अनेक वर्षांपासून ही बढती प्रक्रिया रखडली होती. आता या बढतीद्वारे आत्मासाठी सर्वाधिक २४ आणि स्मार्ट प्रकल्पासाठी १४ अधिकाऱ्यांचे मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. हे संभाव्य १४ अधिकारी स्मार्टमध्ये रुजू झाल्यास कासव गतीने सुरू असलेल्या स्मार्टला गती मिळणार आहे.**



### बढतीतही रुसवे-फुगवे

**बढती प्रक्रियेत ८१ अधिकाऱ्यांना बढती मिळणार आहे. यातील बहुतेक अधिकाऱ्यांची बढती रखडली होती. पंधरा वर्षांहून अधिक काळ होऊनही त्यांना बढती मिळत नव्हती. त्यामुळे ज्येष्ठ व अनुभवी अधिकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. पण, काही अधिकाऱ्यांनी अगदी दहा वर्षांहून कमी काळ काम केलेले असूनही, त्यांची नावे बढतीच्या यादीत आहेत. या बाबत काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.**

# देशमुखी खाकया!

## कर थकविणाऱ्यांना दणका : सहायक आयुक्त देशमुख 'ऑन फायर मोड'

पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने थकीत मिळकत धारकांबाबत कठोर भूमिका घेण्यास सुरूवात केली आहे. शहरातील 50 हजारांपुढे थकबाकी असणाऱ्या 26 हजार 760, पाच लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या व्यावसायिक 1 हजार 361 तर मालमत्ता कराचा एकदाही भरणा न केलेल्या 3 हजार 850 मिळकत धारकांना जप्तीच्या नोटीसा कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांनी धाडल्या आहेत. तसेच, या मिळकत धारकांकडे तब्बल 631 कोटी रुपयांचा कर थकीत असल्याचेही देशमुख यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड शहरात 5 लाख 79 हजार मिळकतींची नोंद आहे. चालू आर्थिक वर्षात आत्तापर्यंत सुमारे तीनशे कोटी रूपये कराचा भरणा केला आहे. महापालिकेच्या 17 विभागीय कार्यालयामार्फत कर संकलानांचे कामकाज केले जाते. गतवर्षी कर संकलन विभागाने 625 कोटी कर वसूल केला होता. यंदा मात्र, कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांनी 1 हजार कोटी रूपयांचे टार्गेट पूर्ण करण्यासाठी कंबर कसली आहे. त्यादृष्टीने कर संकलन विभाग सातत्याने नव-नवीन योजना राबवत आहेत. शहरातील जास्तीत-जास्त मिळकती कर कक्षेत येण्यासाठी कर संकलन विभागाच्या वतीने माझी मिळकत माझी आकारणी यो योजना सुरू केली आहे. या योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात मिळकती कर कक्षेत आल्या आहेत. तसेच जनसंवादच्या धर्तीवर महिन्याचा शेवटच्या शनिवारी करसंवादचेही आयोजन करण्यात येत आहे.

कर संकलन विभागाने शहरातील 50 हजारांपुढे थकबाकी असणाऱ्या 26 हजार 760, पाच लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या 1 हजार 361 तर मालमत्ता कराचा एकदाही भरणा न केलेल्या 3 हजार 850 मिळकत धारकांची यादी काढली आहे. त्यानुसार 31 हजार 971 मिळकत धारकांना आपली मालमत्ता जप्त का करू नये, अशा नोटीसा धाडल्या आहेत. या सर्व मिळकत धारकांकडे शास्तीकर वगळून तब्बल 631 कोटी रूपयांची थकबाकी आहे. या सर्व मिळकत धारकांनी लवकरात-लवकर कर भरून, महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांनी केले आहे. तसेच त्वरीत कर न भरल्यास मिळकती जप्ती करण्यात येतील, असा इशाराही देशमुख यांनी दिला आहे.



**करसंकलन विभाग आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह आग्रही आहेत. 1 हजार कोटींचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न आणि आवश्यक ती पावले उचलावीत, अशा सूचना आयुक्त सिंह यांनी दिल्या आहेत.**

**– निलेश देशमुख, सहाय्यक आयुक्त कर आकारणी व कर संकलन विभाग.**

### चिखलीत सर्वात जास्त थकबाकीदार

कर संकलनासाठी महापालिकेच्या वतीने शहरातील 17 ठिकाणी विभागीय कार्यालये आहेत. या कार्यालयाअंतर्गत पाच लाखांच्या पुढे थकबाकी असलेल्या 1 हजार 361 व्यावसायिक मिळकती आहेत. या थकबादीरांकडे तब्बल 216 कोटी रूपयांचा कर थकीत आहे. सर्वाधिक थकबाकीदार हे चिखली 209, त्यानंतर वाकड परिसरात 146, भोसरीत 128, दापोडी, फुगेवाडीत 117, आकुर्डी 112, चिंचवड 105, थेरगाव 100 आदी भागातील थकबाकीदार आहेत.

### एकादाही कर न भरलेल्या मिळकत धारकांची संख्या 3 हजार 850

मालमत्ता बांधल्यापासून एकदाही कराचा भरणा न केलेल्या मिळकतींची आकडेवारी समोर आली आहे. 13 ऑगस्ट रोजी झालेल्या राष्ट्रीय लोकअदालतमध्ये या 3 हजार 850 मिळकत धारकांना कर संकलन विभागाने नोटीसा पाठविल्या आहेत. त्यांच्याकडे 23 कोटी 25 लाखांची थकबाकी आहे.

कर संकलन विभाग तीन टप्प्यांत थकीत मालमत्ता धारकांवर जप्तीची कारवाई करणार आहे. पहिल्या टप्प्यात पाच लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या 1 हजार 361 व्यावसायिक मालमत्तांवर, दुसऱ्या टप्प्यात मालमत्ता कराचा एकदाही भरणा न केलेल्या 3 हजार 850 मिळकत धारकांवर तर तिसऱ्या टप्प्यात 50 हजारांपुढे थकबाकी असणाऱ्या 26 हजार 760 धारकांवर जप्तीची कारवाई केली जाणार आहे, असे देशमुख यांनी म्हटले आहे.

# सांगवीतील स्पर्धेत ४० हून अधिक पथकांचा 'वाद्यनाद'

## शिवतांवड मंडळाचा पहिला क्रमांक : वादन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड शहरात प्रथमच सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर ढोल-ताशा पथकांची वादन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यात चाळीसहून अधिक ढोल ताशा पथकाने सहभाग घेत वादन केले. आमदार लक्ष्मण जगताप व चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांच्या वतीने ढोलताशा पथक वादन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये चिखली येथील शिवतांडव ढोल ताशा पथकाने प्रथम क्रमांक पटकावला. सांगवी येथील मल्हार ढोल ताशा पथकाने द्वितीय क्रमांक, तृतीय क्रमांक स्वरमुद्रा ढोलताशा पथक वडगाव शेरी यांनी पटकावला. उत्तेजनार्थ मातृभूमी ढोल ताशा पथक, वादक ढोल ताशा पथक यांना बक्षीस देण्यात आली.



या स्पर्धेत विविध भागातून चाळीसहूनू अधिक ढोल ताशा पथके तर १० झांज पथके सहभागी झाली होती. एकाच ठिकाणी अनेक ढोल ताशा पथकांच्या वादनाचा आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात मैदानावर नागरिकांनी गर्दी केली होती.

एकाहून एक असे सरस ढोल ताशा पथकांच्या वादनाने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी शंकर जगताप, अश्विनी जगताप, जयश्री जगताप-रेणुसे, माऊली जगताप, परिसरातील माजी नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धा पार पाडण्यासाठी सागर अंगोळकर, सुनील देवकर, जीवन जाधव, आदेश नवले, अमित शिंदे, शुभम गायकवाड, आदित्य म्हस्के, शिवादित्य ढोल ताशा पथक, शंकरशेठ जगताप मित्र परिवार यांनी परिश्रम घेतले.

**गणेशोत्सव पार पाडण्यासाठी मागील दोन महिने आधीपासून पथके अथक परिश्रम घेतात. ढोल ताशा वादन ही पारंपरिक विर वादन आहे. गणेश विसर्जन मिरवणुका पार पडल्यानंतर श्रमपरिहार व एकाच ठिकाणी वादन होऊन त्यांचे कौतुक व्हावे, हा स्पर्धेमागील उद्देश होता.**

**- शंकर जगताप,** निवडणूक प्रभारी, चिंचवड विधानसभा, भाजपा.

## संपादकीय »

# शिल्लकसेने'ची दुटप्पी भूमिका

***केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकताच मुंबई दौरा केला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी शिवसेनेबाबतची आपली भूमिका स्वच्छ शब्दांत मांडली. 'ज्या शिवसेनेने २०१९ मध्ये भारतीय जनता पक्षाला दगा दिला त्या उद्धव ठाकरे यांच्या शिल्लकसेनेला क्षमा नाही', अशा अत्यंत स्पष्ट शब्दांत शहा यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट केली.***

शहा यांच्या या वक्तव्याला अनेक अर्थांनी महत्त्व आहे. शिवसेना नेतृत्वाने त्या वेळी भाजप नेतृत्वाने अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद देण्याचा शब्द न पाळल्याने आम्ही युतीतून बाहेर पडलो, अशी लोणकढी थाप मारली होती. पुढे त्यांनी भारतीय जनता पक्षाशी दगाबाजी करत काँग्रेस-राष्ट्रवादीबरोबर सरकार स्थापन केले. शिवसेनेच्या नेतृत्वाने थातूरमातूर स्पष्टीकरण देत, त्या वेळी भाजपचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या अमित शहा यांच्या उपस्थितीत मातोश्रीवर झालेल्या कथित बैठकीचा दाखला दिला होता. असा कोणताही शब्द भाजप नेतृत्वाने शिवसेनेला दिला नव्हता, हे शहा यांनी अनेकदा जाहीरपणे सांगितले होते.

एवढी मोठी दगाबाजी करूनही शिवसेना नेतृत्वाचे समाधान झाले नाही. राज्यातील सत्तेचा गैरवापर करून शिवसेनेच्या नेतृत्वाने भाजप नेत्यांवर, कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करत सूडबुद्धीचे विकृत प्रदर्शन घडविले. अशा शिवसेना नेतृत्वाचा यापुढील काळात थेट मुकाबला करण्याची भूमिका शहा यांनी मांडली. अपेक्षेप्रमाणे शिवसेना नेतृत्वाला हे आव्हान पेलता आले नाही. आजवर भाजप नेतृत्वाने युती टिकवण्यासाठी अनेकदा एक पाऊल मागे घेतले आहे, हे विसरून शिवसेनेच्या नेतृत्वाने सत्तेसाठी दगाबाजी केली. भाजप नेतृत्वाने दगाबाजी विसरून आपल्याशी पुन्हा मैत्री करावी, अशी सेनेच्या नेतृत्वाची अपेक्षा असावी. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाने १९८९ पासून हिंदूत्वाची व्यापक भूमिका लक्षात घेऊन शिवसेनेबरोबरच्या जागावाटपात अनेकदा पडती भूमिका घेतली. यानिमित्ताने भाजप-शिवसेना मैत्रीच्या इतिहासाचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

१९८४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी झालेली भाजप-सेनेची युती अल्पायुषी ठरली. १९८९ मध्ये भाजप आणि शिवसेनेच्या नेतृत्वाने हिंदूत्वाच्या आधारावर युतीची घोषणा केली. त्या वेळी लोकसभेच्या जागावाटपात भाजप मोठा भाऊ तर विधानसभेच्या जागावाटपात शिवसेना मोठा भाऊ असे सोपे सूत्र ठरले. गेल्या काही वर्षांत उद्धव ठाकरे युतीत आम्ही सडलो, असे वक्तव्य वारंवार करत होते. सोयीचा इतिहास सांगणे, निवडक तपशील विसरणे, काही बाबतीत रेटून खोटे बोलणे अशा तीन गोष्टी उद्धव ठाकरे यांनी अलीकडे आत्मसात केल्या आहेत. जे निवडक विसरण्याची पद्धत आहे त्यासाठी आठवण करून देतो की तुमचा पक्ष जन्माला येण्याआधी मुंबईत आमचे नगरसेवक होते, आमदारही होते.

# पुण्याचा पाऊस आणि कमी पडलेली माध्यमे

प्रासंगिक

विक्रांत पाटील
8007006862



पुण्याच्या पावसाचे आणि भीषण वास्तवाचे नेमके वर्णन करण्यात आज तशी पुण्याची मुद्रित आणि मुख्य प्रवाहातील मानली जाणारी इतर माध्यमेही फारच कमी पडली. सोशल मीडियात पुण्याच्या पावसाच्या दाणादाणीच्या नेमक्या पोस्ट्सचा महापूर होता. सोशल मीडियाने पुण्याचा पाऊस जबरदस्त कव्हर केला. ट्विटर, फेसबुक, इन्स्टा, यू-ट्यूब ने नेमके आणि रिअल टाईम चित्र मांडले. राजकारण्यांना नेटकऱ्यांनी जबरदस्त धुतला. 'मुंबई म्हणजे तुंबई' असा टोला देणाऱ्यांना आज एका पावसानं झोडपलं... समुद्राची कमतरता होती ती पण आज पूर्ण झाली... बाकी बोटी तरी आता स्वत:च्या आणा... असा टोला मानसी पाटील हिने लगावला. पुण्यातली माध्यमे : पुणे तुंबविण्यास जबाबदार असणाऱ्या भ्रष्ट राजकारणी आणि विशेषत: वर, खाली, सर्वत्र असे ट्रिपल इंजिन सरकार असलेल्या पालिकेतील सत्ताधारी BJP4PUNE बाबत मुख्य प्रवाहातील माध्यमे फारच सॉफ्ट दिसली.

आधीच्यांहून अधिक भ्रष्ट राजकारणी, बेपर्वा सत्ताधीश, कर्तव्यभान हरवलेले निष्क्रिय व कुचकामी अधिकारी आणि बिल्डर लॉबी तसेच अतिक्रमणाने या शहराच्या पाणी निचरा व्यवस्थेचा गळा घोटला आहे. तुम्ही पाण्याची वाट अडवली तर आता पाणी तुमच्या वाटेत येऊन तुमची वाट लावणारच!

परवा मुख्यमंत्र्यांनी पुण्यात बाप्पा दर्शन दौरा केला. त्याऐवजी राज्याचे प्रमुख म्हणून शिंदे-फडणवीस यांनी पुण्याच्या समस्या, अडचणी, कोंडी याची माहिती घेतली असती तर पुणेकरांना बाप्पा पावला असता. पुणे असे पाण्यात वाहून गेले नसते. मात्र, इथे आपल्या कर्तव्याचे भान उरलेय कुणाला?

पुण्याचा एकदम ओक्के कार्यक्रम केला सत्ताधाऱ्यांनी!

काय पाऊस
काय तुंबातुंबी
काय दाणादाण
एकदम ओक्केमध्ये झालं सारं

मुख्यमंत्री पुण्यात बाप्पाचे दर्शन घ्यायला आले तेव्हाच मी हडपसर परिसरात थोड्या पावसाने रस्त्यावर कशा नद्या वाहू लागतात, ते सांगितले होते. हडपसर तर तुंबलेच पण कोथरुड, दिघी, विमाननगर, येरवडा, कोंढवा, कात्रज एव्हढेच काय तर स्वारगेट सारं सारं पुणे काल गटारगंगेत न्हाऊन निघाले. लाभार्थी आणि लाचार माध्यमे बोलणार नाहीत; पण हे सध्याचे अतिभ्रष्ट, बेपर्वा सत्ताधीश, मुजोर बिल्डर आणि नालायक अधिकारी तसेच शहराचा गळा घोटणारा अनियंत्रित विकास यांचे पाप आहे. पुणेकरा, आता तरी जागा हो, नाहीतर तुझा ओक्केमध्ये कार्यक्रम होतच राहील.

VIKRANT@JOURNALIST.COM

# ब्रिटनच्या पंतप्रधान लिज ट्रस, भारतासाठी आशेचा किरण

**लिज ट्रस यांनी ब्रिटनचे परराष्ट्र मंत्रीपदही भूषवले आहे. तसेच त्यांना राजकारणाचा दांडगा अनुभव असून त्यांची आंतरराष्ट्रीयस्तरावर अनेक बड्या राजकीय नेत्यांबरोबर मैत्रीपूर्व संबंध आहेत. ट्रस या २०१० साली पहील्यांदा ब्रिटीश संसदेच्या सदस्य बनल्या होत्या.**

ब्रिटनच्या पंतप्रधानपदाच्या शर्यतीत लिज ट्रस यांचा विजय झाला असून भारतीय वंशाचे ऋषी सुनक यांचा मात्र पराजय झाला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून ब्रिटनचे नवे पंतप्रधान म्हणून सुनक यांच्या नावाची चर्चा होती. मात्र ब्रिटनने ४७ वर्षीय लिज ट्रस यांनाच पसंती दिली. ट्रस यांना ८१,३२६ मत मिळाली तर सुनक यांना ६०,३९९ मत मिळाली आहेत. पण विशेष म्हणजे सुनक यांच्या पराजयाने ब्रिटनपेक्षा भारतीय जनतेलाच अधिक दुख झाले आहे. कारण ऋषी सुनक हे कट्टर हिंदूत्वादी असून भारतीय समर्थक आहेत. यामुळे ब्रिटनच्या पंतप्रधानपदी त्यांची निवड झाली असती तर त्याचा फायदा दोन्ही देशातील भारतीय जनतेला झाला असता. पण लिज ट्रस ब्रिटनच्या नव्या पंतप्रधान झाल्याने त्याचा भारत ब्रिटन संबंधावर काय परिणाम होणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.



त्यासाठी लिज ट्रस यांच्या राजकीय प्रवासाबददल जाणून घेणे महत्वाचे आहे.

लिज ट्रस यांनी ब्रिटनचे परराष्ट्र मंत्रीपदही भूषवले आहे. तसेच त्यांना राजकारणाचा दांडगा अनुभव असून त्यांची आंतरराष्ट्रीयस्तरावर अनेक बड्या राजकीय नेत्यांबरोबर मैत्रीपूर्व संबंध आहेत. ट्रस या २०१० साली पहील्यांदा ब्रिटीश संसदेच्या सदस्य बनल्या होत्या. त्यानंतर दोनच वर्षानंतर २०१२ साली पहील्यांदाच त्या शिक्षण मंत्र्याच्या रुपात डेविड कॅमरूनच्या मंत्रिमंडळात सामील झाल्या होत्या. त्यानंतर २०१४ मध्ये त्या पर्यावरण मंत्री झाल्या. २०१५ साली कंझर्वेटीव्ह कॉन्फ्ररन्समध्ये ट्रस यांनी पनीरवर दिलेल्या भाषणाची जगभऱात खिल्ली उडवली गेली होती.

तर दुसरीकडे ट्रस यांचा भारताप्रती सकारात्मक दृष्टीकोन असून रशिया युक्रेन युद्धादरम्यान भारताच्या भूमिकेवर अनेक देशांनी प्रखर टिका केली होती. त्यावर ट्रस यांनी आक्षेप घेतला होता. परराष्ट्र मंत्री असताना एप्रिल महिन्यात लिज ट्रस भारत दौऱ्यावर होता. त्यावेळी त्यांनी भारत ब्रिटनमधील व्यापार, संरक्षण, पर्यावरणासह शिक्षण क्षेत्रात एकत्रित काम करण्याचे समर्थन केले होते. विशेष म्हणजे भारत हा इंडो पॅसिफिकचा पक्का खेळाडू असून मोठी बाजारपेठ असणारा देश आहे. यामुळे ब्रिटनच्या पंतप्रधानपदावर कोणीही नेता आला तरी त्याला भारताबरोबर सुदृढ संबंध ठेवावेच लागतात.

## ।। अभंगवाणी ।।



धर्माची तूं मूर्ती ।
पाप पुण्य तुझे हातीं ॥१॥
मज सोडवीं दातारा ।
कर्मापासूनि दुस्तरा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## महाराष्ट्रातील प्रकल्पांवर आधीपासून डोळा, अनेक प्रकल्प गेले गुजरातमध्ये



। मुंबई । महाईन्यूज ।

वेदांता-फॉक्सकॉनचा प्रकल्प गुजरातला गेल्याने राज्यातील राजकारण पुन्हा एकदा तापण्याची शक्यता आहे. कारण गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रातील अनेक उद्योग, सरकारी कार्यलाये आणि प्रस्तावित प्रकल्प आयत्यावेळेला गुजरातला हलवण्यात आल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. यावरून तत्कालीन काळात विरोधकांनी केंद्र सरकारवर तुफान टीकाही केली. मात्र, त्यानंतरही महाराष्ट्राला उभारी देणारे, रोजगार निर्माण करणारे प्रकल्प गुजरातला हलवण्यात आल्याने राजकीय नेत्यांपासून ते सामान्य नागरिकांपर्यंत सर्वांनी संताप व्यक्त केलाय. दरम्यान, गेल्या काही वर्षात मुंबहून गुजरातला नक्की काय काय गेलंय यावर एक दृष्टीक्षेप टाकूयात.

दरम्यान, मुंबईतील अनेक उद्योग गुजरातला नेण्याचे प्रकार गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे.

### तळोजातील औद्योगिक वसाहत गुजरातला

तळोजा येथे मोठी औद्योगिक वसाहत आहे. २०१७ पर्यंत येथे साडेसहाशे लहानमोठे कारखाने होते. यामध्ये अनेक रासायनिक कारखाने आहेत. त्यामुळे या परिसरात प्रदूषणाची मोठी समस्या आहे. प्रदूषणामुळे तळोजा औद्योगिक वसाहतीतील वातावरण गढूळ असतं. त्यामुळे येथील अनेक कारखान्यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावल्या जात जातात. त्याबरोबरच कारखाने बंद केले जात आहेत. या परिस्थितीमुळे अनेक कंपन्या गुजरातल्या वळवण्यात आल्या आहेत. २०१७ च्या आकेडवारीनुसार दीपक फर्टिलायझर, दीपक नायट्रेट, गॅलक्सी, केलॉग्ज, यासारख्या कंपन्यांनी नवीन विस्तार प्रकल्प गुजरातला हलवण्याचा निर्णय घेतला होता.

# रिक्षा, टॅक्सी चालक संघटनांचा 15 सप्टेंबरचा संप मागे!

## उद्योग मंत्री उदय सामंत यांची मध्यस्थी



। मुंबई । महाईन्यूज ।

रिक्षा व टॅक्सी चालक संघटनांनी 15 सप्टेंबरचा संप मागे घेतल्याची माहिती समोर येत आहे. राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी याबाबत माहिती दिली आहे. उदय सामंत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनंतर रिक्षा व टॅक्सी चालक संघटनांशी चर्चा केली. या चर्चेदरम्यान रिक्षा व टॅक्सी चालक संघटनांना संप न करण्याचे आवाहन केले. या आवाहना रिक्षा व टॅक्सी चालक संघटनांनी सकारात्मक प्रतिसाद देत संप मागे घेतला असल्याची माहिती उदय सामंत यांनी दिली. मुंबई टॅक्सीमेन यूनियन संघटनेशी उदय सानंत यांनी चर्चा केली.

आजच्या झालेल्या बैठकीत उदय सामंत यांनी "तुम्ही संप करू नका याचा त्रास नागरिकांना होऊ शकतो", अशी विनंती केली. दरम्यान, टॅक्सी चालकांच्या मागण्यांवर 4 दिवसांनी पुन्हा एकदा बैठक आयोजित केली जाणार असल्याची माहिती उदय सामंत यांनी दिली. टॅक्सी आणि रिक्षा दरवाढीसंदर्भात 10 दिवसांचा वेळ मागितल्याचे सामंत यांनी सांगितलं. टॅक्सी चालक संघटनांकडून देखील राज्य सरकारला 10 दिवसांचा वेळ देत 15 सप्टेंबरचा बेमुदत संप लांबणीवर टाकण्यात आला आहे.

### निर्णय न झाल्यास पुन्हा एकदा संप पुकारू...

**याबाबत मुंबई टॅक्सीमेन्स संघटनेने माहिती देण्यात आली असून, निर्णय न झाल्यास पुन्हा संपाचा निर्णय घेणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच, दरम्यान, "उदय सामंत यांच्या आवाहनानंतर संप 10 दिवस मागे घेत असल्याचे सांगण्यात आले आहे. आम्ही सरकारला 10 दिवसांचा वेळ देत आहोत. मात्र, त्या 10 दिवसांमध्ये निर्णय न झाल्यास पुन्हा एकदा संपाचा निर्णय घेऊ", असे मुंबई टॅक्सीमेन्स संघटनेने म्हटले.**

# 'भाकरीच्या चंद्रा'ने विद्यार्थ्यांची गळती थांबवली!

## जत तालुक्यातील शाळेची ऊसतोडकऱ्यांच्या मुलांसाठी अनोखी स्पर्धा

। सांगली। महाईन्यूज ।

पोटाच्या आगीसाठी स्थलांतरित होणाऱ्या ऊसतोडकऱ्याच्या मुलांची शाळा आणि त्यासोबतच शिक्षण सुटू नये यासाठी शाळेने शिक्षणाबरोबरच मुलांना स्वयंपाक बनवण्याचे ज्ञान द्यायला सुरुवात केली. यातूनच भाकर स्वहस्ते तयार करण्याच्या अनोख्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. जत तालुक्यातील कुलाळवाडीच्या जिल्हा परिषद शाळेतील या उपक्रमाने शाळेतील विद्यार्थ्यांची गळती तर थांबलीच पण मुलेही स्वावलंबी बनली. शिवकालात आदिलशाहीची राजधानी असलेल्या विजापूरपासून २० किलोमीटर सांगली जिल्ह्याच्या सीमेवर असलेले १ हजार ५९४ लोकवस्तीचे कुलाळवाडी गाव. या गावातील बहुतांश लोक दसऱ्याच्या मुहूर्तावर ऊसतोडीसाठी स्थलांतर करतात. यामुळे मुलांचीही कबिल्याबरोबर फरपट ठरलेली असायची. यामुळे शाळेतील संख्या रोडावत होती. यामागील कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न येथील शिक्षक भक्तराज गर्जे यांनी केला. यातून असे लक्षात आले, की आईवडील ऊसतोडीला गेल्यानंतर घरी कुणीतरी एखादी व्यक्ती, त्यातही एखादी वृद्ध व्यक्ती राहते. मग या व्यक्तींना ही मुळे सांभाळणे त्याअर्थाने जड जाते. या मुलांसाठी वसतिगृहाची सुविधा उपलब्ध नसल्याने त्याप्रकारची सोयदेखील उपलब्ध होत नाही. मग ही मुलेही मधेच शाळा सोडून देत आईवडिलांबरोबरच हंगामावर रवाना होतात. दसऱ्याला गेलेली ही मुले कारखान्याचा हंगाम संपेपर्यंत गावी परतत नाहीत. यामुळे त्यांची शाळा आणि शिक्षण दोन्हीही सुटते.

गावातील मुलांच्या या शाळा गळतीतील मोठे प्रमाण लक्षात आल्यावर या शाळेतील शिक्षकांनी मुलांना स्वावलंबी करत त्यांच्या घरातील एखाद-दुसऱ्या व्यक्तीसोबत राहण्यासाठी कंबर कसली.



### 90 विद्यार्थी यशस्वी

**भाकरी करीत असताना शाळेतील शिक्षिका सोनीला वनखंडे यांच्यासह मुलींचे मार्गदर्शन घेण्याची सवलत मात्र स्पर्धकांना आहे. आतापर्यंत ९० मुले भाकरी करण्याची कला शिकून बाहेर पडली. या सर्व मुलांना केवळ भाकरी येऊ लागल्याने त्यांची शाळेतील गळती आणि त्याबरोबरच शिक्षणातील गळती देखील थांबली. आता ही सर्व मुले शिक्षणाच्या पुढच्या प्रवासाला लागलेली असली तरी त्यांच्यातील ही भाकरीची कला आता त्यांना कायम सोबत करत आहे. सांगलीचे तत्कालिन जिल्हाधिकारी डॉ. अभिजित चौधरी यांनीही शाळेस भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले होते.**

## नवनीत राणांचे अमरावतीच्या पोलीस आयुक्तांवर गंभीर आरोप

। अमरावती। महाईन्यूज ।



अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांनी अमरावती येथील राजापेठ पोलीस ठाण्यात कॉलरेकॉर्डींगवरून पोलीस अधिकाऱ्यांशी हुज्जत घातली होती. घरातून बेपत्ता झालेली मुलगी लव्ह जिहाद प्रकरणात अडकली असल्याचा आरोप नवनीत राणा यांनी केला होता. त्यांनी पोलीस ठाण्यात जाऊन पोलिसांशी बाचाबाची करत जोरदार राडा घातला. संबंधित मुलगी सापडली असून ती घरगुती कारणातून एकटीच घरातून निघून गेल्याचं स्पष्ट झालं आहे. या सर्व घडामोडीनंतर खासदार नवनीत राणा यांच्याविरोधात पोलीस कुटुंबीय आक्रमक झाले आहेत. तसेच अनेकांकडून नवनीत राणा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, या संदर्भात खासदार नवनीत राणा यांनी प्रतिक्रिया दिली आहे. माझ्यावर जे गुन्हे दाखल होत आहेत. त्यामागे पोलीस आयुक्त आरती सिंग यांचा हात आहे, असा आरोप त्यांनी केला आहे. "माझ्यावर जे गुन्हे दाखल होत आहेत, त्यावरून असं दिसतं की पोलीस खात्यात काही मोजके लोक आहेत, ते नेतेगिरी करत आहेत. ते आपल्या खाकी वर्दीचा गैरवापर करत आहेत. आम्ही ज्या कारणासाठी पोलीस ठाण्यात आंदोलन केलं ते सार्थकी लागलं. कारण त्या मुलीचे आईवडील माझ्याकडे येऊन तीन तास रडत होते. त्या मुलीला मी घरी परत आणलं आहे", अशी प्रतिक्रिया अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांनी दिली आहे. यावेळी त्यांनी अमरावतीच्या पोलीस आयुक्त आरती सिंग यांच्यावरही आरोप केले आहे. "माझ्यावर जे गुन्हे दाखल होत आहेत. त्यामागे पोलीस आयुक्त आरती सिंग यांचा हात आहे. मात्र, मी अशा केसेला घाबरत नाही, मी ही लढाई माझ्या नागरिकांच्या न्यायहक्कासाठी लढत आहे", असेही त्या म्हणाल्या. दरम्यान, आमदार रवी राणा यांनीही अमरावतीच्या पोलीस आयुक्त आरती सिंह यांच्यावर गंभीर आरोप केले.

# आंबेडकर जयंतीला संचलनाची परवानगी द्या!

## RSS ची मद्रास उच्च न्यायालयात याचिका

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने (आरएसएस) मद्रास उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. २ ऑक्टोबरला संचलनाची आणि त्यानंतर सार्वजनिक सभा घेण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करत आरएसएसने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

आरएसएसने आपल्या याचिकेत म्हटलं की, भारताच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाली आहे. तसेच, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि विजयादशमीच्या पार्श्वभूमीवर संघटनेने त्यांचा गणवेश परिधान करून मिरवणूक काढण्याचा निर्णय घेतला आहे.




**भारताच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाली आहे. तसेच, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि विजयादशमीच्या पार्श्वभूमीवर संघटनेने त्यांचा गणवेश परिधान करून मिरवणूक काढण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतच्या परवानगीसाठी कोरत्तूर पोलीस ठाण्यात अर्जही देण्यात आला आहे. मात्र, अद्यापही त्या अर्जावर निर्णय घेण्यात आला नाही.**

याबाबतच्या परवानगीसाठी कोरत्तूर पोलीस ठाण्यात अर्जही देण्यात आला आहे. मात्र, अद्यापही त्या अर्जावर निर्णय घेण्यात आला नाही. याचिकाकर्त्यांने पुढं सांगितलं की, पोलीस अन्य सर्व राजकीय पक्षांना परवानगी देतात. पण, केवळ आरएसएसला अशा प्रकारे डावलण्यात येते. अधिकारी संविधानाच्या विरोधात काम करतात, असा आरोपही लावण्यात आला. याप्रकरणी आतापर्यंत सात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. आणखी पन्नास याचिका दाखल होतील. त्यामुळे याप्रकरणाची सुनावणी २२ सप्टेंबरपर्यंत तहकूब करण्याचा निर्णय न्यायालयाने घेतला आहे.

### शॉर्ट न्यूज »

### हैदराबादमध्ये इलेक्ट्रिक बाईकच्या शोरुममुळे अग्नितांडव!



**।नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

हैदराबादमध्ये इमारतीला लागलेल्या भीषण आगीत होरपळून आठजणांचा मृत्यू झाला असून, काहीजण जखमी आहेत. सोमवारी रात्री सिकंदराबादमध्ये इलेक्ट्रिक दुचाकींच्या शोरुममध्ये ही आग लागली. ही आग नंतर वरच्या मजल्यावर असणाऱ्या हॉटेलमध्ये पोहोचली आणि इमारतीमध्ये पसरली. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असा अधिकाऱ्यांचा प्राथमिक अंदाज आहे. शोरुम, बेसमेंट आणि पार्किंगमध्ये असणाऱ्या गाड्यांनी पेट घेतला आणि नंतर मोठ्या प्रमाणात धूर झाला. यानंतर हॉटेलमधील कर्मचाऱ्यांनी धूर आणि आग पाहून अग्निशमन दलाला माहिती दिली.

# भाजपची ही 'कर्तव्यपथा'वरील पोटदुखी

## राहुल गांधीच्या 'भारत जोडो' यात्रेचं समर्थन करत शिवसेनेचा भाजपाला सूचक इशारा


**।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

शिवसेनेनं काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेचं समर्थन केलं आहे. राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेवर टी-शर्ट आणि इतर मुद्द्यांवरुन टीका करणाऱ्या भारतीय जनता पार्टीला शिवसेनेनं लक्ष्य केलं आहे. राहुल गांधी मांडत असलेल्या मुद्द्यांवर उत्तरं देण्याऐवजी दुय्यम मुद्द्यांवरुन भाजपा या यात्रेला लक्ष्य करत असल्याने ही 'कर्तव्यपथा'वरील पोटदुखी असल्याचा टोला शिवसेनेनं लगावला आहे. तसेच राहुल गांधी ४१ हजारांचा टी-शर्ट घालतात असं म्हणणाऱ्या भाजपाचे लोक गांधीजींप्रमाणे फक्त पंचा नेसून उघडे फिरून राजकारण करतात काय? मंत्रिमंडळात रोज चरख्यावर बसून सूत कताई करून त्याची वस्त्र शिवून हे लोक अंग झाकतात काय? असे प्रश्न शिवसेनेनं विचारले आहेत.




"राहुल गांधी यांच्या कन्याकुमारी ते कश्मीर अशा 'भारत जोडो' यात्रेने भाजपाची पोटदुखी वाढू लागली आहे. डोकेदुखी नैसर्गिक आहे. राजकीय पोटदुखी ही एक प्रकारच्या विकृत मानसिकतेतून जन्मास येते. पोटात व डोक्यात वळवळणारे किडे तोंडातून म्हणजे शब्दांतून बाहेर पडतात. भाजपा प्रवक्त्यांनी असे किडे तोंडावाटे सोडायला सुरुवात केली आहे. राहुल गांधी हे 'भारत जोडो' पदयात्रेत जे 'टी शर्ट' वापरत आहेत त्याची किंमत ४१ हजार रुपये असल्याची माहिती भाजपा प्रवक्त्यांनी जाहीर केली. या अशा वक्तव्यांनी काय साध्य होणार?" असा प्रश्न शिवसेनेनं विचारला आहे. "राहुल गांधी व त्यांचा काँग्रेस पक्ष त्यांचे काम करीत आहे. 'भारत जोडो' ही एक चांगली संकल्पना आहे. भारतात कुठे काही मतभेद असतील, मने दुभंगली असतील, कुठे फुटीरतेची बिजे पसरली असतील तर त्यास जोडण्याची जिद्द घेऊन राहुल गांधी बाहेर पडले आहेत. देशभरात मैलोन् मैल ते चालणार आहेत. लोकांशी संवाद साधणार आहेत. याचे स्वागतच व्हायला हवे. पण भारतीय जनता पक्षाने राहुल यांच्या 'टी शर्ट'ची किंमत जाहीर केली. मग भारतीय जनता पक्षाचे लोक गांधीजींप्रमाणे फक्त पंचा नेसून उघडे फिरून राजकारण करतात काय? मंत्रिमंडळात रोज चरख्यावर बसून सूत कताई करून त्याची वस्त्र शिवून हे लोक अंग झाकतात काय? की प्रखर हिंदुत्ववादी वगैरे असल्याने ऋषीमुनींप्रमाणे फक्त वल्कले नेसून मंत्रालयात अथवा पक्ष कार्यालयात जातात?" असे खोचक प्रश्न शिवसेनेनं भाजपाला विचारले आहेत. "आता राहुल गांधींच्या 'टी शर्ट'ची किंमत जाहीर करताच जयराम रमेश यांनी पंतप्रधान मोदी यांचा दहा लाखांचा सूट व सव्वा लाखाचा चष्मा काढला. आणखी बरेच काही बाहेर निघेल. भारतीय जनता पक्षाने राजकारण कोणत्या पातळीवर नेऊन ठेवले आहे?" असा प्रश्नही 'सामना'च्या अग्रलेखातून विचारण्यात आला आहे.

"लोकांत जागृती करण्याचे काम ही यात्रा करीत आहे व तेच भाजपाच्या पोटदुखीचे कारण व आजार आहे. आज देशात स्वातंत्र्य राहिलेले नाही. घराणेशाही परवडली असे वाटावे इतका एकाधिकारशाही व हुकूमशाहीचा कहर सुरू आहे. चिदंबरम यांनी प्रखर, पण सहज भाषेत सांगितले आहे. ते म्हणतात, "भारत जोडो यात्रा भारताचा दुसरा स्वातंत्र्य लढा आहे. देशातील विभाजनकारी शक्तींचा जोपर्यंत पराभव होत नाही तोपर्यंत हा लढा सुरूच राहणार. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात महात्मा गांधी यांनी 'करो या मरो' असा नारा दिला होता. काँग्रेसच्या आजच्या यात्रेवर टीका करणाऱ्या लोकांचा या लढ्यात सहभाग नव्हता." चिदंबरम यांनी जे सांगितले त्यावर भाजपा प्रवक्त्यांनी प्रतिवाद केला पाहिजे. स्वातंत्र्य लढ्यात व देश घडविण्याच्या प्रक्रियेत आपण खरेच होतो काय, असा प्रश्न 'भारत जोडो' यात्रेवर हल्ला करणाऱ्यांनी स्वत:ला एकदा विचारायला पाहिजे. पण असे प्रश्न जे विचारतात त्यांचे शर्ट काय किमतीचे, घड्याळ कोणत्या कंपनीचे, चपला कोणत्या ब्रॅण्डच्या वगैरे वायफळ प्रतिहल्ले केले जात आहेत," असं म्हणत शिवसेनेनं भाजपाला लक्ष्य केलं आहे.




# कंगनासोबत काम करण्याचा सगळ्यात मोठा पश्चाताप!'

स्कॅम 1992 चे निर्माता आणि दिग्दर्शक हंसल मेहता हे नेहमीच त्यांच्या कलाकृतीसाठी ओळखले जाणारे सेलिब्रेटी आहे. चित्रपट क्षेत्रातून त्यांनी ओटीटी प्लॅटफॉर्मवर केलेलं पदार्पण नेटकऱ्यांना भावलं. त्यांच्या पहिल्याच मालिकेला प्रचंड यश मिळाल्याचे दिसून आले आहे. कोट्यवधीचा घोटाळा करणाऱ्या हर्षद मेहतावर आधारित स्कॅम 1992 मालिकेला प्रेक्षकांची अमाप लोकप्रियता मिळाली. हंसल मेहता हे नेहमीच त्यांच्या वेगवेगळ्या प्रतिक्रियांमुळे देखील चर्चेत असतात. आता त्यांनी प्रसिद्ध अभिनेत्री कंगनावर केलेली कॉमेंट सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे.

# मसाज करायला गेली, गोत्यात आली!

बॉलीवूडमधील प्रसिद्ध सेलिब्रेटी कश्मिरा शहा ही तिच्या हटकेपणाबद्दल नेहमीच चर्चेत असणारी अभिनेत्री आहे. वादग्रस्त वक्तव्यं करणं, कुणाबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी करणे यामुळे ती अनेकदा नेटकऱ्यांच्या रडारवर आली आहे. सोशल मीडियावर सतत ॲक्टिव्ह असणाऱ्या कश्मिरानं आपल्या अनोख्या अंदाजानं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.



आता तिच्या व्हायरल झालेल्या एका व्हिडिओनं वेगळ्याच चर्चेला सुरुवात झाली आहे. मसाजसाठी गेलेल्या कश्मिराला आपल्या सुटकेसाठी मदतीची याचना करावी लागली आहे. व्हायरल झालेल्या त्या व्हिडिओमध्ये कश्मिरा जोरजोरानं ओरडताना दिसत आहे. तिनं आपल्या सुटकेसाठी लोकांकडे मदत मागितली आहे. बॉलीवूडमध्ये ग्लॅमरस लूक असणाऱ्या ज्या अभिनेत्री आहेत त्यात कश्मिराचेही नाव घ्यावे लागेल. या अभिनेत्रीनं केलेलं बोल्ड फोटोशुट हे नेटकऱ्यांना आवडले आहे. यापूर्वी देखील तिनं कित्येकदा केलेल्या फोटोशुटची सोशल मीडियावर चर्चा झाली आहे. त्याचं झालं असं की, कश्मिरा ही मसाज करायला गेली पण तिथे जे झालं त्यामुळे तिला विनाकारण आणखी दुसऱ्या एका समस्येला सामोरं जावं लागलं आहे. त्या परिस्थितीतून सुटका करण्यासाठी तिनं मदतीचे आवाहन केले. मसाज सेंटरवर जे काही चालते त्याविषयीच्या अनेक बातम्या आपण सोशल मीडियावर वाचत असतो. पोलिसांकडून देखील अशा प्रकारच्या मसाज सेंटरवर छापा टाकल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. आता त्यात कश्मिराला आलेल्या वेगळ्या अनुभवानं सगळ्याचे लक्ष वेधले गेले आहे. कश्मिराचा जो व्हिडिओ व्हायरल झाला आहे त्यामध्ये ती एका मसाज सेंटरमध्ये मसाज करण्यासाठी आली होती.

# मंदाकिनीने केला बॉलीवुडचा अजब खुलासा; ॲक्ट्रेसचा वापर.



बॉलीवुड क्षेत्रात ऑनस्क्रिन जेवढ्या घडामोडी प्रेक्षकांना बघायला मिळतात तेवढ्याच या क्षेत्रात ऑफस्क्रिन घडामोडीही घडत असतात. मात्र याची कल्पना प्रेक्षकांना नसते. ७०-८० च्या दशकात बॉलीवुड गाजवणारी अभिनेत्री मंदाकिनीने पडद्यामागील याच घडामोडींवर भाष्य करत बॉलीवुडची पोलखोल केली आहे. एका मुलाखतीत मंदाकिनीने बॉलीवुड क्षेत्रातील मानधनापासून ते अभिनेत्रींना दिल्या जाणाऱ्या वागणुकीपर्यंतचे गुढ किस्से सांगितलेत. वेटरन ॲक्ट्रेस मंदाकिनीने १९८५ मध्ये 'मेरा साथी' या चित्रपटातून बॉलीवुड डेब्यू केला होता. मात्र तिला खरी ओळख मिळाली ती 'राम तेरी गंगा मैली' या चित्रपटातून. अलीकडे या अभिनेत्रीने बॉलीवुडमध्ये मानधन देताना होण्याऱ्या भेदभावावर भाष्य केलं आहे. त्या काळी संपूर्ण चित्रपटात काम केल्यानंतर फिमेल ॲक्ट्रेसला फक्त एक ते दीड लाख मानधन मिळायचे.

# लग्नानंतरही महिमा नव्हती खुश

परदेस' फेम अभिनेत्री महिमा चौधरी ही फार काळ बॉलीवुडमध्ये ॲक्टिव्ह नसली तरी तिच्या पर्सनल लाईफमुळे ती जास्त चर्चेत राहिलेली अभिनेत्री आहे. वयाच्या ४९ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या या अभिनेत्रीची लव केमिस्ट्री फारच क्लिश्ट होती. एके काळी लोकप्रिय असणारी ही अभिनेत्री स्वत:च्या लग्नात नाराज होती अशी चर्चा होती. त्यामागचं नेमकं खरं कारण काय ते जाणून घेऊया. अभिनेत्री महिमाचं अफेयर एके काळी टेनिस खेळाडू लिएंडर पेससोबत सुरू होतं अशी चर्चा होती. मात्र रिया पल्लईमुळे या दोघांच्या नात्यात दुरावा आला. नंतर २००६ मध्ये त्यांचं लग्न बिजनेसमॅन बॉबी मुखर्जीशी झालं. मात्र हे नातंही जास्त काळ टिकलं नाही. आयुष्यात आलेत बरेच चढउतार

२०२१ मध्ये माध्यमांशी बोलताना महिमाने तिच्या पर्सनल आयुष्यातील काही गंभीर किस्से शेअर केलेत. त्यातील एका घटनेचा परिणाम थेट तिच्या करियरवर झाला. याबरोबरच लग्नानंतरच्या अडचणी आणि दोनदा झालेले गर्भपात यावरही तिने भाष्य केले.



# चांगल्या अभिनेत्रीपेक्षा सुंदर अभिनेत्रींना मिळतो भाव! उषाजींचं कडक उत्तर



मराठी - हिंदी चित्रपट, नाटक आणि मालिकांमध्ये आपल्या अभिनयाची वेगळी छाप उमटविणाऱ्या उषा नाडकर्णी या लोकप्रिय अभिनेत्री आहेत. त्यांची संवादफेकीची अनोखी लकब ही नेहमीच चाहत्यांना भावली. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी चित्रपट, मालिकाविश्वात स्वताचे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

परखड व्यक्तिमत्व, सडेतोड स्वभाव यामुळे उषाजी या नेहमीच चर्चेत राहिल्या आहेत. आज त्यांचा जन्मदिवस. आपला अभिनय हा चाहत्यांना आवडावा यासाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या उषाजी यांच्या कित्येक चित्रपटातील भूमिका चाहत्यांच्या मनात घर करुन आहेत.

सुबोध भावेच्या 'बस बाई बस' या कार्यक्रमामध्ये उषा नाडकर्णी या सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये सुबोधनं त्यांना वेगवेगळे प्रश्न विचारुन बोलते केले. सोशल मीडियावर त्या मालिकेतील काही व्हिडिओ व्हायरल झाले असून त्याला नेटकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. गेल्या काही दिवसांपासून हिंदी - मराठी चित्रपट, मालिकांमध्ये काम करणाऱ्या अभिनेत्री, त्यांचे दिसणे आणि त्यांचा अभिनय यावरुन वेगवेगळया प्रकारचे प्रश्न उपस्थित केले जात आहे. त्यावर उषा नाडकर्णी यांनी बिनधास्तपणे आपली प्रतिक्रिया दिली आहे.

## शॉर्ट न्यूज »

### अमेरिका खुली टेनिस स्पर्धा : अल्काराझ नवविजेता!



न्यूयॉर्क । महाईन्यूज

स्पेनच्या १९ वर्षीय कार्लोस अल्काराझकडे टेनिसचे भविष्य म्हणून का पाहिले जात आहे, याचा रविवारी मध्यरात्री झालेल्या अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या अंतिम सामन्यात प्रत्यय आला. अल्काराझने नॉर्वेच्या कॅस्पर रुडचा ६-४, २-६, ७-६ (७-१), ६-३ असा पराभव करून अमेरिकन स्पर्धेतील पुरुष एकेरीचे विजेतेपद पटकावले. हे त्याच्या युवा कारकीर्दीतील पहिले ग्रँडस्लॅम जेतेपद ठरले. यासह त्याने जागतिक टेनिस क्रमवारीतही अव्वल स्थानी झेप घेतली आहे. तमाम टेनिस शौकिनांचे लक्ष लागून असलेल्या या अंतिम लढतीत अल्काराझने जबरदस्त ताकद आणि नेटवर प्रभावशाली खेळाचे प्रदर्शन केले. तिसऱ्या मानांकित अल्काराझने कमालीचा आक्रमक खेळ करताना दडपणाचाही चांगला सामना केला.

अंतिम सामन्यात दोन्ही खेळाडूंनी प्रत्येकी एक सेट जिंकल्यानंतर तिसरा सेट कमालीचा रंगला.

# संघाची घोषणा झाली अन् काही खेळाडूंची कारकीर्दच संपली!

## टी-20 विश्वचषकात टीम इंडियाचा भाग होता.

।दुबई । महाईन्यूज ।



भारतीय निवडकर्त्यांनी T20 विश्वचषक 2022 साठी टीम इंडियाची घोषणा केली आहे. विराट कोहली-रोहित शर्मासारख्या दिग्गज खेळाडूंचा या संघात समावेश करण्यात आला आहे. त्यानंतर अर्शदीप सिंगसारख्या युवा खेळाडूंनाही संधी संघात देण्यात आली आहे, मात्र यावेळी एका जादुई गोलंदाजाला संघातून वगळले आहे. हा खेळाडू गेल्या वर्षी झालेल्या टी-20 विश्वचषकात टीम इंडियाचा भाग होता.

आयपीएल 2021 नंतर टी-20 विश्वचषक 2021 खेळला गेला. या विश्वचषकासाठी भारतीय निवड समितीने मिस्ट्री स्पिनर वरुण चक्रवर्ती याला संघात स्थान दिले होते. एकेकाळी असे मानले जात होते की हा मिस्ट्री बॉलर टीम इंडियाचे भविष्य आहे. पण त्या टी-20 वर्ल्ड कपमध्ये तो पूर्णपणे फ्लॉप राहिला. त्यामुळे तो टी-20 वर्ल्ड कप 2021 पासून टीम इंडियातून बाहेर आहे. वरुणने आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी करून टीम इंडियामध्ये स्थान मिळवले होते, पण तो आपल्या खेळाची पुनरावृत्ती करण्यात अपयशी ठरला.

टी-20 विश्वचषक 2021 मध्ये टीम इंडियाची कामगिरी खूपच खराब होती. टीम इंडिया या विश्वचषकाच्या ग्रुप स्टेजमधूनच बाहेर पडली होती, ज्यासाठी वरुण चक्रवर्ती जबाबदार मानले जाता होते. आतापर्यंत टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये वरुण चक्रवर्तीने 6 सामन्यात 2 बळी घेतले आहेत. त्याचवेळी त्याच्या नावावर 42 आयपीएल सामन्यात 42 विकेट आहेत. वरुण चक्रवर्तीने आयपीएल 2021च्या बळावर आपली छाप पाडली होती. मात्र तो यंदाच्या आयपीएलमध्येही फ्लॉप राहिला होता. त्यामुळे त्याच्या टीम इंडियात पुनरागमनाचे दरवाजे पूर्णपणे बंद झाले आहेत. या हंगामात वरुण चक्रवर्तीने 11 सामन्यांत केवळ 6 विकेट घेतल्या होत्या. गेल्या हंगामात चक्रवर्तीने 17 सामन्यात 18 विकेट घेतल्या होत्या.

रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल (उपकर्णधार), विराट कोहली, सूर्यकुमार यादव, दीपक हुड्डा, ऋषभ पंत (विकेटकिपर), दिनेश कार्तिक (विकेटकिपर), हार्दिक पांड्या, आर. अश्विन, युझवेंद्र चहल, अक्षर पटेल, जसप्रीत बुमराह, भुवनेश्वर कुमार, हर्षल पटेल, अर्शदीप सिंग. स्टँड बाय खेळाडू : मोहम्मद शमी, श्रेयस अय्यर, रवी बिश्नोई, दीपक चाहर

# भारताची महिला क्रिकेटपटू वेदा कृष्णमुर्तीला रणजीपटूने केले प्रपोज



।केर्न्स (ऑस्ट्रेलिया) । महाईन्यूज ।

भारतीय महिला क्रिकेट संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. तेथे टीम इंडिया तीन टी 20 सामन्यांची मालिका खेळणार आहे. मात्र वेदा कृष्णमूर्ती या संघाचा भाग नाहीये. सध्या क्रिकेटच्या मैदानापासून दूर निसर्गाच्या सानिध्यात आहे. मात्र ही व्हेकेशनवर असलेली वेदा नुकतीच चर्चेत आली. कर्नाटकचा रणजीपटू अर्जुन होएसलाने वेदा कृष्णमूर्तीला सुंदर अशा हिल स्टेशनवर प्रपोज केले. याचे फोटो अर्जुनने इन्स्टाग्राम अकाऊंवर शेअर केले असून ते सध्या व्हायरल होत आहेत. अर्जुनने वेदा कृष्णमूर्तीला प्रपोज करतानाचे फोटो शेअर करत त्याला 'आणि तिने होकार दिला.' असे कॅप्शन दिले. फोटोमध्ये वेदा कृष्णमूर्तीला अर्जुनने प्रपोज केल्यावर विश्वासच बसला नसल्याचे दिसून येते. यानंतर वेदाने अर्जुनला मिठी मारली. दोघांनीही एकमेकांना रिंग घातली. दरम्यान, वेदाला टीम इंडियातील अनेक क्रिकेटपटूंनी आयुष्याच्या नव्या टप्प्यासाठी शुभेच्छा दिल्या.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही